आमदार सत्यजीत तांबेंची विधिमंडळात दमदार कामगिरी

धोरणात्मक ११४ प्रश्नांवर विधानपरिषदेचे वेधले लक्ष

संगमनेर (प्रतिनिधी)– नाशिक पदवीधर मतदार संघाचे प्रतिनिधीत्व करताना आमदार सत्यजीत तांबे यांनी शिक्षक, बेरोजगार, पदवीधर, डॉक्टर, इंजिनिअर, शेतकरी यांसह समाजातील सर्व घटकांचे विविध प्रश्न पावसाळी अधिवेशनात अत्यंत आग्रहपूर्वक मांडले असून सरकारकडून त्या सर्वांना सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. आगामी काळामध्ये या सर्व प्रश्नांचा आपण पाठपुरावा करू, असे त्यांनी समाज माध्यमाद्वारे जनतेशी संवाद साधताना सांगितले.

संगमनेर येथे पावसाळी अधिवेशनात केलेल्या कामाची माहिती देताना ते म्हणाले, माजी मंत्री बाळासाहेब थोरात आणि माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली आपण कायम कामाला प्राधान्य दिले असून सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी कटिबद्ध राहिलो आहे. या पावसाळी अधिवेशनामध्ये माझी १०० टक्के उपस्थिती राहिली असून ५२ तारांकित प्रश्न उपस्थित केले. त्यापैकी ४० प्रश्न स्वीकृत झाले होते. तसेच ११ लक्षवेधी सूचना आपण मांडल्या. सर्व सरकारी कर्मचाऱ्यांना कॅशलेस मेडिकल सुविधा मिळावी याची मागणी केली असून याकरीता समिती स्थापन झाली आहे. याचबरोबर अर्धा तास होणाऱ्या चर्चेमध्ये ४ विषय मी मांडले. यामध्ये शेतकऱ्यांचा कांदा प्रश्न हा अत्यंत महत्त्वाचा असून यावर पणन मंत्री जयकुमार रावल यांनी अत्यंत सकारात्मक भूमिका घेतली आहे. प्रश्नांवरून उद्भवलेल्या चर्चेवर ५ विषय मी मांडले, त्याचबरोबर ५ अशासकीय ठराव विधान परिषदेत मांडले. खाजगी विधेयकामध्ये भावी पिढ्यांचा शाश्वत विकासयावर कायदा करावा अशी आपण मागणी केली. याचबरोबर १४ औचित्याचे मुद्दे उपस्थित केले. ९३ अन्वये ४ विशेष सूचना मांडल्या. तर पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनमध्ये १२ सूचना मांडून सरकारचे लक्ष वेधले आहे. आदिवासी आणि झोपडपट्टी विभागांमध्ये अनेक बोगस डॉक्टर कार्यरत असून ते सर्वसामान्य जनतेच्या आरोग्याशी खेळत असल्याकडे लक्ष वेधले. वैज्ञानिक विकास महामंडळ हे अनुशेष भरून काढण्यासाठी असून याबाबत विशेष मुद्दा मांडला. शेततळ्यांना कंपाउंड करण्याकरीता अनुदान मिळावे, अशी आग्रही मागणी केली. छत्रपती शिवाजी महाराज हे देशाचे आराध्य दैवत आहे आणि त्यांचा इतिहास सीबीएसई पॅटर्नमध्ये समावेश करावा ही कायम मागणी राहिली आहे. एकूणच राज्यातील शेतकरी, युवक, बेरोजगार, डॉक्टर, वकील, इंजिनिअर, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, शासकीय कर्मचारी अशा अनेकांचे विविध प्रश्न नाशिक-पुणे रेल्वे प्रकल्पाकडेही लक्ष वेधले.

ग्रामीण भागातही आता जमिनी आरोग्य तपासणी प्रयोगशाळा

१५ ठिकाणी कृषी विभागाने मागवले अर्ज; दीड लाखांचा तोकडा निधी ठरणार अडसर

अहिल्यानगर (प्रतिनिधी)– राष्ट्रीय कृषी विकास योजने अंतर्गत मृद आरोग्य व सुपीकता कार्यक्रम २०२५-२६ मध्ये आता जिल्ह्याच्या ग्रामीण भागातही मृद तपासणी (जमीन आरोग्य तपासणी) प्रयोगशाळा उभारणी करण्यात येणार आहे. जिल्ह्यासाठी अशा १५ प्रयोग शाळांचे उद्दिष्ट्ये देण्यात आले असून या प्रयोग शाळांसाठी कृषी विभागाच्यावतीने इच्छुकांकडून अर्ज मागवण्यात आले आहेत. मात्र, या प्रयोग शाळांसाठी केवळ दीड लाखांचा निधी देण्यात येणार असल्याने हा ताकडा निधी या प्रयोग शाळांना अडसर ठरण्याची चिन्हे आहेत.

राष्ट्रीय कृषी विकास योजना कॅफेटरीया अंतर्गत मृद आरोग्य व सुपीकता कार्यक्रम २०२५-२६ मध्ये राज्यात नव्याने दोन लाख २२ हजार मृद नमुने तपासणीचे उद्देश ठेवण्यात आले आहे. यासाठी प्रत्येक जिल्ह्यात एका तालुक्यातून किमान एक या तत्वावर गाव पातळीवर जमीन आरोग्य तपासणी प्रयोग शाळा उभारण्यात येणार आहे. यासाठी राज्याच्या कृषी आरखड्यास मंजूर देण्यात आली आहे. या आराखड्यानूसार नगर जिल्ह्यात गाव पातळीवर नव्याने १५ जमीनप्रयोग शाळांना मान्यता देण्यात आली आहे. राज्यात अशा प्रकारे ४४४ नवीन गाव पातळीवर प्रयोग शाळा उभारण्यात येणार आहेत. यासाठी कृषी संचालक (निविष्ठा व गुण नियंत्रण) कृषी आयुक्तालय पुणे यांचेकडून मान्यता देण्यात आली आहे. यात केंद्र शासनाच्या मार्गदशक सुचनान्वये कृषी विभाग संबंधीत मृद प्रयोग शाळेला आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देणार आहे. यासाठी व्यक्ती, शेतकरी, कृषी उत्पादक संस्था, कृषी चिकित्सालय आणि कृषी-व्यावसाय केंद्रे, माजी सैनिक बचत गट, शेतकरी शेतकरी सहकारी संस्थ, कृषी निविष्ठा किरकोळ विक्रेते आणि शाळा/ कॉलेज, युवक / युवती यांना यासाठी अर्ज करता येणार आहे.

यासाठी इच्छुकांनी प्रत्येक तालुक्याच्या कृषी विभागाकडे ८ ऑगस्टपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालय यांच्याकडून करण्यात आले आहे. लक्षांकापेक्षा अधिक अर्ज प्राप्त झाल्यास जिल्हास्तरीय निवड समितीकडून सोडत काढण्यात येऊन लाभार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे. मृद चाचणी प्रयोगशाळेसाठी लाभार्थी निवडीच्या निकषात लाभार्थी युवक/युवती हा १८ ते २७ वयोगटातील असावा. तसेच शेतकरी उत्पादक संस्था, विविध कार्यकारी सहकारी संस्था हे देखील या योजनेत अर्ज करू शकणार आहेत. लाभार्थ्यांच्या पात्रतेबाबत जिल्हा स्तरावरील समिती निर्णय घेणार असून लाभार्थ्यांची शैक्षणीक अर्हता ही किमान १० वी (विज्ञान विषयासह) उत्तीर्ण असणे बंधकारक असून अर्जदाराने अर्जासोबत शैक्षणिक अर्हतेसोबत आधार कार्ड, पॅनकार्ड जोडणे आवश्यक आहे. अर्जदार/गटाची स्वतः ची इमारत किंवा किमान ४ वर्ष भाडे करार केलेली इमारत असणे आवश्यक असल्याचे जिल्हा कृषी अधीक्षक सुधाकर बोराळे यांनी सांगितले.

प्रत्येकी मिळणार अवघे दीड लाख

दरम्यान, सध्या नगरच्या जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयात जिल्ह्याची एकमात्र जमीन आरोग्य पत्रिका प्रयोग शाळा कार्यरत आहे. या ठिकाणी जिल्हाभरातून माती नमुने संकलित करून त्या ठिकाणी तपासणी करण्यात येते. त्यानूसार जमीनीची आरोग्य पत्रिका तयार करण्यात येत आहे. भविष्यात ग्रामीण भागात सहजासहजी शेतकऱ्यांना त्याच्या शेतीचे आरोग्य समजावे, यासाठी कृषी आयुक्तालयाकडून गाव पातळीवर मृग तपासणी प्रयोग शाळांना मान्यता देण्यात आली आहे. मात्र, प्रत्येक प्रयोग शाळेला प्रत्येकी अवघा दीड लाखांचा निधी मंजूर करण्यात आला असून यात अशा प्रयोग शाळा सुरू होणे अशक्य असल्याने कृषी विभागाला या योजनेत किती प्रतिसाद मिळणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

दहावी, बारावीच्या पुरवणी परीक्षेचा आज निकाल

पुणे (प्रतिनिधी)– महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने जून-जुलै २०२५ मध्ये घेतलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) आणि उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) पुरवणी परीक्षेचा निकाल मंगळवार, २९ जुलै २०२५ रोजी दुपारी १.०० वाजता ऑनलाईन जाहीर करण्यात येणार आहे.

मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत १० वीची पुरवणी परीक्षा २४ जून २०२५ ते ०८ जुलै २०२५ या कालावधीत, तर १२ वीची पुरवणी परीक्षा २४ जून २०२५ ते १६ जुलै २०२५ या कालावधीत घेण्यात आली होती.

गुणपडताळणी आणि उत्तरपत्रिकेच्या छायाप्रतीसाठी अर्ज:

ऑनलाईन निकालानंतर लगेचच दुसऱ्या दिवसापासून विद्यार्थ्यांना स्वतःच्या अनिवार्य विषयांपैकी (श्रेणी विषयांव्यतिरिक्त) कोणत्याही विशिष्ट विषयात संपादित केलेल्या गुणांची गुणपडताळणी आणि उत्तरपत्रिकांच्या छायाप्रतींसाठी संबंधित विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पद्धतीने संकेतस्थळावर अर्ज करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. यासाठी बुधवार, ३० जुलै २०२५ ते शुक्रवार, ०८ ऑगस्ट २०२५ पर्यंत ऑनलाईन अर्ज करता येतील आणि शुल्क डेबिट कार्ड/क्रेडिट कार्ड/UPI/नेट बँकिंगद्वारे भरता येईल.

पुनर्मूल्यांकनासाठी प्रक्रिया:

उत्तरपत्रिकेच्या पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज करण्यापूर्वी मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरून उत्तरपत्रिकेची छायाप्रत मिळवणे अनिवार्य आहे. छायाप्रत मिळाल्याच्या दिवसापासून पुढील पाच कार्यालयीन दिवसांत विद्यार्थ्यांनी विहित नमुन्यात, विहित शुल्क भरून संबंधित विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पद्धतीने अर्ज करणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी संबंधित विभागीय मंडळाशी संपर्क साधावा.

श्रेणी/गुणसुधार योजना

जून-जुलै २०२५ च्या १० वी आणि १२ वी परीक्षेत सर्व विषयांसह प्रथम प्रविष्ट होऊन उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांची संपादणूक सुधारण्यासाठी श्रेणी/गुणसुधार योजनेअंतर्गत परीक्षेस प्रविष्ट होण्यासाठी पुढील तीन संधी उपलब्ध असतील: फेब्रुवारी-मार्च २०२६, जून-जुलै २०२६ आणि फेब्रुवारी-मार्च २०२७.

फेब्रुवारी-मार्च २०२६ मधील परीक्षांसाठी नियमित, पुनर्परिक्षार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी, श्रेणीसुधार योजनेअंतर्गत प्रविष्ट होणारे विद्यार्थी आणि ITI द्वारे Transfer of Credit घेणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे ऑनलाईन पद्धतीने स्वीकारली जातील. यासंदर्भात तारखा मंडळामार्फत स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येतील.

प्रसाद ओक कुटुंबासह साईचरणी नतमस्तक

शिर्डी (प्रतिनिधी)– मराठी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध अभिनेता प्रसाद ओक आपल्या कुटुंबासह शिर्डीत येऊन साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले.

यावेळी माध्यमांशी संवाद साधताना प्रसाद ओक म्हणाले, शिर्डीत साईबाबांच्या बोलावणीशिवाय येण शक्य होत नाही. आज श्रावण महिन्याचा पहिला सोमवार आहे आणि बाबांचं बोलवणं आल्याने शिर्डीत येता आलं. समाधीचे दर्शन घेतल्यावर मनाला शांती आणि समाधान मिळालं.

प्रसाद ओक यांनी यावेळी महाराष्ट्र आणि मराठी चित्रपट सृष्टीच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रार्थना केली. सध्या अनेक ठिकाणी परिस्थिती कठीण आहे. साईबाबांनी सर्वांना उत्तम आरोग्य, भरपूर अन्नधान्य आणि समृद्धी द्यावी. मराठी चित्रपटसृष्टीवर आलेलं संकट दूर होऊन पुन्हा सोन्याचे दिवस यावेत, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

साईदर्शनानंतर साईबाबा संस्थानचे उपकार्यकारी अधिकारी भिमराज दराडे यांनी प्रसाद ओक आणि त्यांच्या कुटुंबीयांचा शाल आणि साईमूर्ती देऊन सत्कार केला. वर्कफ्रंटवर, प्रसाद ओकचा गुलकंद आणि शीला जीत हे चित्रपट चांगलेच गाजले होते. शीला जीत या चित्रपटाचे दिग्दर्शन त्यांनी केले असून स्वप्नील जोशी आणि सोनाली कुलकर्णी यांनी मुख्य भूमिका साकारली होती.

साडेतीन कोटी नागरिकांना रोजगाराची संधी

नवी दिल्ली– देशातील बेरोजगार तरुणांसाठी केंद्र सरकारकडून एक महत्त्वाची घोषणा करण्यात आली आहे.

येत्या १ ऑगस्ट २०२५ पासून प्रधानमंत्री विकासशील भारत रोजगार योजना अंमलात येणार आहे. या योजनेअंतर्गत तब्बल ३.५ कोटी रोजगार संधी निर्माण करण्याचं लक्ष्य ठेवण्यात आलं असून, केंद्राने यासाठी ९९,४४६ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. विशेषतः उत्पादन क्षेत्रात रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार आहे. या योजनेमुळे सुमारे १.९२ कोटी युवक पहिल्यांदाच औपचारिक कामगार क्षेत्रात सामील होणार असल्याची माहिती कामगार मंत्रालयाने दिली आहे.

सुरत-अहिल्यानगर-राहुरी-चेन्नई महामार्गाच्या ४१३ किमीच्या पहिल्या टप्प्यातील भूसंपादनाला केंद्रीय अर्थ मंत्रालयाची मंजुरी

मुंबई– गेल्या काही दिवसापासून राज्यात चर्चेत असलेल्या सुरत-चेन्नई महामार्गाच्या बाबतीत एक अतिशय महत्त्वाचे असे अपडेट समोर आले असून राज्यामध्ये लवकरच या महामार्गाच्या कामाला गती मिळेल अशी शक्यता यामुळे निर्माण झालेली आहे. सुरत ते चेन्नई हा महामार्ग राज्यातील नाशिक, अहिल्यानगर तसेच बीड व सोलापूर इत्यादी जिल्ह्यातून जाणार असल्याने आणि सुरत, हैदराबाद आणि चेन्नई हे प्रमुख औद्योगिक शहरे महाराष्ट्राशी जोडले जाणार असल्यामुळे कृषी आणि उद्योग क्षेत्राच्या दृष्टिकोनातून हा महामार्ग अतिशय फायद्याचा ठरणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार या महामार्गाच्या काम राज्यात लवकर सुरू होण्याची शक्यता आहे.

नाशिकच्या आडगाव ते सोलापूर दरम्यानच्या ३८३ किमीचे प्रत्यक्ष बांधकाम तसेच नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यातील आंबेगण ते सोलापूर असे ४१३ किमीचे भूसंपादन हे पहिल्या टप्प्यामध्ये केले जाणार असून त्याला आता केंद्रीय अर्थ मंत्रालयाने मंजूर दिल्याची माहिती समोर आलेली आहे. आता हा महामार्ग मंजुरीकरिता केंद्रीय मंत्रिमंडळासमोर ठेवण्यात आला असून पुढील पंधरा दिवसात त्याला मंजूरी मिळण्याची शक्यता आहे व ही मंजूरी मिळाल्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल. सुरत-चेन्नई महामार्गाची घोषणा २०२२ मध्ये झालेली होती व त्यानुसार १२५० किलोमीटरचा हा महामार्ग चेन्नई ते अक्कलकोटपर्यंत जवळपास तयार झालेला आहे.

यात पहिला टप्पा बघितला तर नाशिक मधील आडगाव ते सोलापूरपर्यंत असून त्याची लांबी ३८३ किलोमीटर आहे व दुसऱ्या टप्प्यात आडगाव ते सुरतपर्यंत बांधकाम व दिंडोरी तालुक्यातील आंबेगण ते सुरत पर्यंतच्या भूसंपादनाचा समावेश आहे. येथील नाशिक ते सुरतचा जो दुसरा टप्पा आहे तो वनविभागाच्या परवानगी नंतर सुरू होऊ शकेल. हा महामार्ग उत्तर आणि दक्षिण भारताला जोडण्यासाठी अतिशय उपयुक्त असून सध्या सुरत आणि चेन्नई दरम्यानचा प्रवास करण्यासाठी जो काही ३५ तासांचा वेळ लागतो तो प्रवास फक्त १८ तासांमध्ये पूर्ण करता येणार आहे.

तसेच राज्यातील नासिक, अहिल्यानगर, बीड आणि सोलापूर या भागातून हा महामार्ग जाणार आहे. तसेच याला नाशिक जिल्ह्यातील वावीत समृद्धी महामार्गाला आणि नाशिकमध्ये मुंबई ते आग्रा या महामार्गाला देखील कनेक्टिव्हिटी मिळणार आहे. दुसरे म्हणजे सुरत ते नाशिक हे अंतर २२५ किमी वरून १७६ किमीवर येणार असून हा प्रवास पूर्ण करण्यासाठी सध्या ६ तास लागतात. परंतु हा महामार्ग पूर्ण झाल्यानंतर सुरत ते नाशिक प्रवास फक्त अडीच तासात पूर्ण करता येणार आहे. यासाठी नाशिक जिल्ह्यातील ९९५ हेक्टर जमीन लागणार असून पहिल्या टप्प्यात जवळपास ८५० हेक्टर जमिनीचे भूसंपादन करण्यात येणार आहे. अहिल्यानगरमधील संगमनेर, राहाता, राहुरी, अहिल्यानगर, कर्जत, जामखेडमधील अनेक गावातून हा महामार्ग जाणार आहे.

पान १ वरुन

मराठमोळी दिव्या देशमुख बनली...

अंतिम फेरीतील दुसरा सामनाही बरोबरीत सुटला. दुसरा सामनाही १-१ ने बरोबरीत सुटला. त्यामुळे आता ट्रायब्रेकरने विजेता निश्चित होणार असल्याचं स्पष्ट झालं.

सरकारी कर्मचाऱ्यांच्या सोशल...

मर्यादा असणे. तसेच शासकीय धोरणांबाबत अथवा कोणत्याही राजकीय घटना/व्यक्ती यांचेबाबत शासकीय सेवा नियमांचे उल्लंघन करुन प्रतिकूल अभिप्राय नोंदविणे, इ. प्रकारे सोशल मिडियाचा अनुचित वापर होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

शासकीय कर्मचाऱ्यांच्या वर्तणूकीबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ तयार करण्यात आले आहेत. सदर नियम राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या सोशल मिडियाच्या वापराबाबतही लागू होतात. वर्तणूक नियमांचा भंग केल्यास संबंधित कर्मचारी शिस्तभंगविषयक कारवाईस पात्र ठरतो. या पार्श्वभूमीवर सोशल मिडियाच्या वापराबाबत पुढीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेतः

महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील अधिकारी/कर्मचारी (प्रतिनियुक्तीने तसेच करारपध्दतीने, बाह्यस्त्रोताद्वारे नियुक्त केलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांसह), स्थानिक स्वराज्य संस्था, मंडळे, महामंडळे आणि सार्वजनिक उपक्रम यामधील अधिकारी/कर्मचारी (प्रतिनियुक्तीने तसेच करारपध्दतीने, बाह्यस्त्रोताद्वारे नियुक्त केलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांसह) या सर्वांना या मार्गदर्शक सूचना लागू राहतील.

राज्य शासनाच्या किंवा भारतातील अन्य कोणत्याही शासनाच्या चालू किंवा अलिकडच्या धोरणावर किंवा कृतीवर प्रतिकूल टीका करु नये, शासकीय कर्मचाऱ्याने सोशल मिडीयाचा वापर अत्यंत जाणीवपूर्वक व जबाबदारीने करावा, शासकीय कर्मचाऱ्याने त्याचे वैयक्तिक व कार्यालयीन सोशल मिडिया खाते (अकाऊंट) हे दोन्ही स्वतंत्र ठेवावेत. केंद्र/राज्य शासनाने बंदी घातलेल्या वेबसाईट, ॲप, इ. चा वापर करु नये.शासनाद्वारे प्राधिकृत केलेल्या व्यक्तीस सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने शासकीय योजना, उपक्रम इत्यादींच्या प्रसार व प्रचारासाठी तसेच लोकसहभागाकरीता केवळ शासकीय तसेच अधिकृत माध्यमांचा वापर करता येईल. कार्यालयांतर्गत कामकाजाबाबत समन्वय/संपर्क साधण्यासाठी व्हॉटस्ॲप, टेलिग्राम, इ. मेसेजिंग प्लॅटफॉर्मचा वापर करता येईल.

शासनाच्या/विभागाच्या योजना/ उपक्रम यांच्या यशस्वितेच्या अनुषंगाने अधिकारी कर्मचारी यांनी सांघिक प्रयत्न केल्याबाबत सोशल मिडियावर मजकूर लिहीता येईल मात्र त्यामुळे स्वयंप्रशंसा होणार नाही याची दक्षता घ्यावी. अधिकाऱ्यांनी केलेल्या वैशिष्टयपूर्ण शासकीय कामाबाबत मजकूर पोस्ट करता येईल मात्र त्याद्वारे स्वयंप्रशंसा होणार नाही याची खबरदारी घ्यावी.वैयक्तिक सोशल मिडिया अकाऊंटवर केवळ प्रोफाईल फोटो वगळता, आपल्या शासकीय पदनामाचा, लोगो, वर्दी/गणवेष तसेच शासकीय मालमत्ता जसे की वाहन, इमारत, इत्यादींचा वापर फोटो/रिल्स/व्हीडीओ अपलोड करतांना टाळावा.आक्षेपार्ह, द्वेषमूलक, मानहानीकारक तसेच भेदभाव उत्पन्न होणारे मजकूर, इ. शेअर/अपलोड/फॉरवर्ड करु नयेत.प्राधिकृत केल्याशिवाय तसेच पूर्व मंजूरीशिवाय कोणतेही गोपनीय दस्तऐवज, शासकीय तसेच कार्यालयीन कागदपत्रे, अंशतः तसेच पूर्ण स्वरुपात शेअर/अपलोड/फॉरवर्ड करु नयेत. बदली झाल्यानंतर कार्यालयीन सोशल मिडिया अकाऊंट योग्य प्रकारे हस्तांतरीत करावे. ज्या कर्मचाऱ्याकडून उपरोक्त मार्गदर्शक सूचनांचा भंग होईल त्याचेवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ तसेच अन्य संबंधित नियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल.

भंडारदरा धरणात २४ तासांत...

सोडण्यात येत आहे. काल सायंकाळी या धरणातील पाणीसाठा ९६७१ दलघफू (८७.६१टक्के) होता. पाण्याची आवक कमी झाल्याने विसर्ग ४८०६ क्युसेसने सुरू होता. १ ऑगस्टला धरणातील पाणीसाठा ९२ टक्के करण्यात येणार आहे. निळवंडेतही नवीन पाण्याची आवक सुरू असल्याने पाणीसाठा ७४०८ दलघफू (८८.९५टक्के) झाला होता. विसर्ग ८१४५ क्युसेसने सुरू होता.

कोतुळ वार्ताहराने कळविले की, मुळा पाणलोट क्षेत्रात पावसाची संततधार सुरूच आहे. जोरदार वारा आणि पावसाने परिसरातील जनजीवन गाठून गेले आहे. पावसाच्या सातत्याने मुळा नदी दुथडी वाहत आहे.

सकाळी सहा वाजता कोतूळ येथून मुळा धरणाकडे १३,८३६क्यूसेने आवक सुरू होती तर सायंकाळी सहा वाजता ६५९२ क्यूसेसने आवक सुरु होती. त्यामुळे २६ टीएमसी क्षमतेच्या मुळा धरणाकडे पाण्याची दमदार आवक होत आहे

काल रविवारी रात्री १२ तासांत सुमारे एक टीएमसी च्या जवळपास (९४४ दशलक्ष घनफूट) एवढ्या विक्रमी नवीन पाण्याची आवक झाली तर काल सोमवारी सकाळी सहा ते सायंकाळी सहा वाजेपर्यंतच्या बारा तासाच्या अंतरात अर्धा टीएमसी एवढ्या विक्रमी पाण्याची नवीन पाण्याची आवक झाली

यामुळे मुळा धरणाचा पाणीसाठा काल सायंकाळी सहा वाजता २१ टीएमसीचा टप्पा पूर्ण केला आहे. या वर्षात मुळा धरणात १२८२५ दशलक्ष घनफूट एवढा नवीन पाणीसाठा जमा झाला आहे. तर २६ टीएमसी क्षमतेच्या मुळा धरणात काल सायंकाळी ६ वाजता मुळा धरणाचा पाणीसाठा २१७०६ दशलक्ष घनफूट पर्यंत पोहोचला असून मुळा धरण ८३ टक्के भरले आहे.

नितीन शेटे यांची गळफास घेऊन...

यावेळी शनिशिंगणापूर परिसरातील नागरिक नातेवाईक व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. मागील एक-दीड महिन्यापासून शनिशिंगणापूर देवस्थानच्या बनावट ॲप घोटाळा व येथील गैरव्यवहार गाजत आहे. विधानसभेतही हा मुद्दा प्रामुख्याने गाजला. देवस्थानच्या गैरव्यवहाराची चौकशी सुरू आहे, तसेच बनावट ॲप घोटाळ्याबाबत शनिशिंगणापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, या घोटाळ्यात काही अधिकारी तसेच कर्मचारी संशयाच्या भोवऱ्यात असल्याची चर्चा होत असताना देवस्थानच्या एका अधिकाऱ्याने आत्महत्या केली आहे. या प्रकरणी शनिशिंगणापूर पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद झाली असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. नितीन शेटे यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, मुलगा, भाऊ असा परिवार आहे. प्रगतशील शेतकरी सूर्यभान शेटे यांचा ते चिरंजीव होत.

जलजीवन योजनांचा चेंडू...

विषय होणाऱ्या ग्रामसभांपुढे मांडण्यात येणार आहे.

दरम्यान, कागदोपत्री पूर्ण, पाणी पुरवठा न होणाऱ्या योजनांचे हस्तांतरण संबंधीत गावाने ग्रामसभेद्वारे करून घेतल्यास जिल्हा परिषद पाणी पुरवठा विभागाची जबाबदारी संपणार असून आतापर्यंत आरोपीच्या पिंजऱ्यात असणाऱ्या पाणी पुरवठा विभागाची जबाबदारी या हस्तांतरण प्रक्रियेद्वारे संपणार आहे. जिल्ह्यात दरवर्षी ऑगस्ट महिन्यांत जिल्ह्यातील प्रत्येक गावात ग्रामसभांचे आयोजन करण्यात येते. यंदा जिल्ह्यातील या ग्रामसभांमध्ये प्रामुख्याने सात विषय घेण्याचे आदेश जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी भंडारी यांनी काढले आहेत. यात पहिल्या क्रमांकावर जलजीवन विषय असून या योजनेत पूर्ण झालेल्या योजनांचे हस्तांतरण होणाऱ्या प्रत्येक ग्रामसभेने करून घ्यावे, जिल्ह्यातील ग्रामपंचायती बालविवाहमुक्त करण्याचा संकल्प करून त्यावर कार्यवाही करावी, वृक्ष लागवड कार्यक्रम प्रत्येक गावात यशस्वी करावा, नागरिकांना आपले सेवा सरकार केंद्रातून ३० शासकीय विभागातील ५९२ सेवाबाबत नागरिकांना माहिती देवून संबंधीत सेवा ग्रामपंचायतीमार्फत उपलब्ध करून द्यावी, घनकचरा विलगीकरण व सांडपाणी व्यवस्थापनबाबत प्रत्येक गावात विद्यार्थी व नागरिकांमध्ये जागृती करण्यात यावी, विकसीत महाराष्ट्र व्हीजन २०४७ बाबत नागरिकांचे अभिप्राय नोंदवून घ्यावे, असे विषय जिल्ह्यात पुढील महिन्यांत होणाऱ्या ग्रामसभांसमोर मांडण्याच्या सुचना मुख्य कार्यकारी अधिकारी भंडारी जिल्ह्यातील सर्व गटविकास अधिकारी आणि ग्रामपंचायतींना दिल्या आहेत.

हा प्रकार म्हणजे हात झटकण्यासारखा

जिल्ह्यात जलजीवन योजनेबाबत मोठ्या प्रमाणात तक्रारी आहेत. अनेक ठिकाणी कामे पूर्ण झालेली नसतांना कामे पूर्ण दाखवण्यात आलेल्या आहेत. याबाबत अनेक बैठकांमध्ये गंभीर आरोप झालेले असतांना कामांची चौकशी करण्याऐवजी जिल्हा परिषदेने या योजनेतील पूर्ण झालेल्या कामांचे हस्तांतरण संबंधीत गावातील ग्रामसभांमध्ये करून घ्यावे, असे सांगणे म्हणजे हा एका प्रकारे जलजीवनच्या अपूर्ण कामाबाबत हात झटकण्याचा प्रकार असल्याची प्रतिक्रिया जिल्हा परिषदेच्या काही माजी सदस्यांनी नोंदवली आहे.

या अधिकाऱ्यांवर ग्रामसभांची जबाबदारी

जिल्ह्यात ऑगस्टमहिन्यांत होणाऱ्या ग्रामसभा त्या हजर असणारे शासकीय अधिकारी या ग्रामसभांचे सहनियंत्रण आणि त्या कधीपर्यंत घ्याव्यावत याबाबतच्या सुचना मुख्य कार्यकारी अधिकारी भंडारी यांनी काढल्या आहेत. यात संबंधीत ग्रामसभेबाबत लेखी कळवणे, सभेचा अजेंडा काढून तो प्रसिध्द करणे, सभेसाठी संपर्क अधिकारी यांची नेमणूक करून विषयनिहाय मार्गदर्शक यांची नेमणूक करणे, जिल्हास्तरावरून तालुका संपर्क अधिकारी नियुक्त करणे व झालेल्या ग्रामसभांचा अहवाल जिल्हा परिषदेला सादर करणे यांचा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशात स्पष्ट उल्लेख करण्यात आला आहे.

एसईबीसी : नॉन-क्रिमीलेअर...

विद्यार्थ्यांना हे आदेश लागू होण्याच्या पूर्वीच्या कालावधीसाठी परीक्षा शुल्क व शिक्षण शुल्क प्रतिपर्ती अनुज्ञेय होणार नाही.

४) राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी असलेली शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती या योजनेकरिता महाडिबीटी प्रणालीवरील संलग्न (मॅपिंग) असलेल्या अभ्यासक्रमांसाठी सदर सुधारणा लागू राहतील.

धर्मांतराचा प्रयत्न अमेरिकन...

रा. उद्यमनगर, अजमेरा, पिंपरी, पुणे) यांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्यासोबत एक अल्पवयीन मुलगाही या प्रकरणात सहभागी होता. हा अल्पवयीन मुलगा भारतीय ख्रिस्ती धर्मप्रसारक आरोपी स्टीव्हन कदम याचा मुलगा असल्याचे सांगण्यात आले आहे. अल्पवयीन मुलाला चौकशीनंतर त्याच्या आईच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सनी बन्सीलाल दनानी (वय २७, रा. पिंपरी कॅम्प, वैष्णोदेवी मंदिराजवळ) यांनी याप्रकरणी पिंपरी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. दनानी हे सिंधी समाजाचे असून, त्यांच्यावर ख्रिश्चन धर्म स्वीकारण्यासाठी मानसिक दबाव टाकला जात होता.

पहलगामच्या हल्लेखोरांचा खात्मा?

रेडिओचा वापर करतात.

भारतीय सुरक्षा दलाला जसा चायनीज अल्ट्रा रेडिओ कम्युनिकेशन सक्रिय झाल्याचा मेसेज मिळाला, तसे सीआरपीएफचे जवान ॲक्शन मोडमध्ये आले. ऑपरेशन महादेव राबवण्यात आलं. या कारवाईत तीन दहशतवादी ठार झाले आहेत, ज्यामध्ये पहलगाम हल्ल्याचा मास्टरमाइंड असलेल्या हाशिम मूसा उर्फ सुलेमान याचा देखील समावेश आहे.

२२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये मोठा दहशतवादी हल्ला झाला होता, या हल्ल्यात अनेकांना आपला जीव गमवावा लागला, या हल्ल्यानंतर भारतानं पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमध्ये एअर स्ट्राईक केला, या एअर स्ट्राईकमध्ये दहशदवाद्यांचे ९ अड्डे उद्ध्वस्त झाले होते, भारताच्या ऑपरेशन सिंदूरमध्ये १०० पेक्षा अधिक दहशतवाद्यांचा खात्मा झाला.